**नाशिक जिल्हा सरकारी व परिषद कर्मचारी सहकारी बँक नियमित नाशिक**
**प्रशासकीय कार्यालय : सोमा हाईटस्, समता संकुल, नवीन आग्रारोड, भाभानगर, मुंबई नाका, नाशिक ४२२०११.**

# शैक्षणिक कर्ज नियमावली

**(दि.०१/१२/२०२२ पासुन लागु)**

१) शैक्षणिक कारणासाठी कर्ज मागणी केल्यास त्यास बँकेचे **'शैक्षणिक कर्ज'** असे संबोधले जाईल.

२) कर्ज मागणी करणारा **सभासद** हा सभासद होवुन किमान १ वर्ष पुर्ण झालेला असावा त्याने बँकेकडुन इतर कर्ज घेतले असल्यास त्याचे सर्व कर्ज खाते नियमित असावे तसेच त्याचा मागील कर्जाच्या परतफेडीचा अनुभव चांगला असावा. बँकेचा कायम सेवक सदरचे कर्ज घेण्यास पात्र राहील तसेच त्या कर्जास जामीनदार म्हणून बँकेतील इतर कायम सेवेतील कर्मचारी चालू शकेल मात्र वरील सर्वांना नियमानुसार **नाममात्र** सभासद व्हावे लागेल.

३) सदर कर्जास दोन **'नियमित'** सभासद जामीनदार द्यावे लागतील. कर्जास दिलेले जामीनदार हे थकबाकीदार नसावेत.

४) सदर कर्जासाठी बँकेच्या विहीत नमुन्यातील कर्ज अर्ज भरावा लागेल.

५) कर्ज मागणी अर्जासोबत कर्जदार सभासद, त्याचे पाल्य व दोन्ही जामीनदार यांचे फोटो जोडणे अत्यावश्यक आहे.

६) सभासदांचे वेतनपत्रकाप्रमाणे सर्व प्रकारची कपात वजा जाता १/३ वेतन हातात पडणे आवश्यक आहे.

७) या कर्जाची कमाल कर्ज मर्यादा रु.५,००,०००/- इतकी असेल मात्र **'शैक्षणिक फी'** व **'कर्ज मर्यादा'** या पैकी जी रक्कम कमी असेल तेवढेच कर्ज मंजुर केले जाईल.

८) सदर कर्ज योजना सभासदांचे 'विवाहीत' व 'अविवाहीत' अशा दोन्ही पाल्यांसाठी असुन पाल्य हया संज्ञेत मुलगा व मुलगी व तसेच त्यांची मुले / मुली (नातु / नात) यांचा समावेश राहील.

९) कर्जदार सभासदाने बँकेकडुन एकुण घेतलेल्या कर्जाच्या ५% शेअर्स असणे अनिवार्य राहील.

१०) शैक्षणिक कर्ज मागतेवेळी आपल्या पाल्यांचे **'गुणपत्रक'** तसेच ज्या शासनमान्य शिक्षण संस्थेत प्रवेश घ्यावयाचा आहे, त्यांचे फी बाबतचे तपशिल दर्शविणारे **'माहिती पत्रक'** व **'मागणी पत्र'** सोबत जोडणे आवश्यक आहे.

११) शैक्षणिक कर्जासाठी आपल्या पाल्यांचा प्रवेश शासनमान्य संस्थेत निश्चित झालेला असणे अत्यावश्यक आहे. सदरची कर्ज योजना सर्व शासनमान्य शैक्षणिक प्रवेशासाठी लागु राहील. सदरच्या कर्जाची परतफेड ECS / ACH ने करण्याची सोय उपलब्ध राहील.

१२) ही योजना संपुर्ण वर्षभरासाठी लागु राहील.

१३) मंजुर कर्जाची रक्कम परस्पर ज्या शासनमान्य शैक्षणिक संस्थेत प्रवेश घ्यावयाचा आहे तेथे चेक, NEFT / RTGS ने पाठविली जाईल. सदरची रक्कम कोणत्याही परिस्थीतीत खात्यावर जमा करुन अथवा रोखीने दिली जाणार नाही.



प्रशासकीय कार्यालय नाशिक

१४) शैक्षणिक कर्जाचा एकदा लाभ घेतल्यानंतर पुनश्च कर्ज घ्यावयाचे झाल्यास रु. पाच लाखा पावेतोच्या मर्यादेपर्यंत नवीन शैक्षणिक कर्ज मंजुरीबाबत विचार केला जाईल. शैक्षणिक कर्ज मंजुरीसाठी अगोदरचे शैक्षणिक कर्ज येणे बाकी व नवीन भरावयाची फी अशा दोन्ही बाबींचा विचार करण्यात येईल. नवीन कर्ज मंजुरीनंतर जुने कर्ज वजावटीने वसुल करुन घेवुन उर्वरीत रक्कम शैक्षणिक संस्थेच्या नावाने अदा करण्यात येईल.

१५) कर्जाचा परतफेडीचा कमाल कालावधी ५ वर्ष इतका राहील. मात्र सभासद तत्पुर्वी सेवानिवृत्त होत असल्यास परतफेडीचा कालावधी त्यांच्या सेवानिवृत्त दिनांका पर्यंत राहील.

१६) कर्ज वितरणानंतर कर्जाची परतफेड तात्काळ EMI पध्दतीने (व्याजासह) सुरु करण्यात येईल. कर्जाचा व्याज दर १०.५०% इतका राहील. फक्त नियमित कर्जफेड करणाऱ्यास या व्याजदराचा लाभ मिळेल. सदरचा व्याजदर हा जुन्या व नवीन अशा दोन्ही कर्जदार सभासदांसाठी लागु राहील. कर्ज थकल्यास थकीत रकमेवर २% दंडव्याज म्हणुन आकारणी केली जाईल.

१७) सदर कर्जाचे सुरक्षिततेसाठी ५ चेक्स दयावे लागतील.

१८) सदर कर्जास पगारवाटप अधिकारी यांची लेखी हमी असणे आवश्यक आहे.

१९) व्हाईटनर लावलेला कर्ज अर्ज कोणत्याही परिस्थीतीत स्विकारला जाणार नाही.

वरील नियम व अटीत बदल करणेचा अधिकार मा. संचालक मंडळाने राखुन ठेवलेला आहे तसेच शैक्षणिक कर्ज मंजुर / नामंजुर करणेचा अधिकार बँकेच्या संचालक मंडळास राहील मात्र कर्ज नामंजुर करणेचे कोणतेही लेखी कारण सभासदास कळविले जाणार नाही.

**संचालक मंडळ सभा दि.२६/११/२०२२ विषय क्र. १२ अन्वये मंजुर सदर निर्णयाची अंमलबजावणी दि.०१/१२/२०२२ पासुन लागु करण्यात येत आहे.**

नाशिक जिल्हा सरकारी व परिषद कर्मचारी सहकारी बँक नियमित, नाशिक
प्रशासकीय कार्यालय नाशिक

| (सुरेश पाटील) | (मंदाकिनी पवार) | (सुधीर पगार) |
|---|---|---|
| **मुख्य कार्यकारी अधिकारी** | **उपाध्यक्षा** | **अध्यक्ष** |